# आंबेडकरवादी कवितेतील स्त्री जाणिवांचे स्वरूप व वैशिष्ट्ये

**प्रा. सिद्धार्थ कुंडलिक इंगोले**
स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान
महाविद्यालय, रिसोड जि.वाशिम.
९९२३३८००६७
skingole79@gmail-com

मराठी साहित्यात १९६० नंतर दलित साहित्य हा अनन्य साधारण स्वरूप व वैशिष्ट्यांसह आढळून येणारा एक साहित्यप्रकार आहे. या विशिष्ट साहित्य प्रवाहाने मराठी साहित्यात स्वत:चे निराळेपण निर्माण करून आपल्या स्व:जाणीव, स्वरूप आणि वैशिष्ट्यांसह आंबेडकर वादाचे स्व: अस्तित्व सिद्ध केले आहे. एवढेच नव्हे तर, या साहित्य प्रवाहाने मराठी साहित्याची व्यापकता व मराठी साहित्याच्या परिघ व त्याच्या आत्मकक्षा समृद्ध आणि व्यापक केल्या आहेत. हे सूर्यप्रकाशाएवढे सत्य नाकारून चालणार नाही. म्हणून या महत्त्वपूर्ण साहित्य प्रवाहाची दखल मराठी साहित्याने व समीक्षकाने आवर्जून घेतली आहे. सर्वसामान्य माणसाच्या जीवनात बदल झाले की, त्यांचे पडसाद जसे सर्वांगीन घटकावर पडतात तद्वतच साहित्यावरही त्याचे परिणाम दिसून येतात. म्हणून स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेमध्ये दलित साहित्यातील आंबेडकरवादी कवींच्या कविताही परिणाम व योगदानासाठी पात्र ठरलेल्या आहेत.

आंबेडकरवादी साहित्याचे प्रेरणास्थान असलेले महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाववही आंबेडकरवादी कवितेवर पडणे सहाजिक आहे. म्हणून तळागाळातील सर्वसामान्य समाज हा प्रचलित परंपरेला नाकारून परिवर्तनाकडे आंबेडकरवादी विचारांची कास धरून वाटचाल करीत आहे. १९५६ च्या क्रांतिकारी धर्मांतराने तमाम वंचितावर जसा परिणाम झाला. तद्वतच त्याचा परिणाम आंबेडकरी लेखणीवर सुद्धा झाला आहे. त्यामुळे आंबेडकरवादी कवितेने साहित्यात नव्हे तर सर्व तळागाळातील समाजाने जीवनातही परिवर्तन करून घेतले आहे. समाजातील क्रांतीचे प्रेरणास्थान असलेले महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा आणि आदर्श घेऊन समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय ,तद्वतच वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून आंबेडकरवादी कवीने आणि त्यांच्या काव्याने आपली लेखणी पाजळून घेतली आहे. आंबेडकरी कवींच्या कवितेमध्ये ग्रामीण समाजातील नव्हे तर नागरी समाजातील ज्वलंत समस्यांना वाचा फोडण्याचे महान कार्य आंबेडकरवादी कवितेने केलेले आहे. आंबेडकरवादी कवितेतील स्त्रीवादी जाणीव ही स्त्रियांना शोषणाच्या विरुद्ध बंड करणारी विद्रोहाची कविता आहे. वेदना, विद्रोह, नकार, या घटकावरून व काव्यातील वर्णनावरून स्पष्टपणे दिसून येते.

## आंबेडकरवादी कवितेतील स्त्री जाणिवांचे स्वरूप वैशिष्ट्ये :—

आंबेडकरवादी कवितेमध्ये सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुता, या मानवी जीवन मूल्यांचा न्यायाच्या भूमिकेचा पाया म्हणजे, आंबेडकरवादी कवितेचा पाया होय. म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात अमूलाग्र परिवर्तन होणे म्हणजेच आंबेडकरवाद होय. हाच आंबेडकरवादी कवितेचा मुख्य केंद्रबिंदू आहे. या केंद्रबिंदूच भोवतीच त्यांचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे. ह्याच संदर्भात आंबेडकरवादी कविता समता, बंधुता, व न्याय या मानवी मूल्यनेच प्रेरित आहे. हे सिद्ध करताना डॉ. पद्‌माकर तामगाडगे म्हणतात की...

''आंबेडकरवादी कविता ही माणसाच्या मुक्तीचे गीत गाते. ती नियतीशरण व निराशवादी नाही. आंबेडकरवादी कवितेतील स्त्री जाणिवेचे सर्व कांगोरे हे मानवतावादी आहेत. समाजातील आदिवासी भटके–,विमुक्त ,कुणबी, तेली, तांबोळी, ख्रिश्चन, मुस्लिम, दलित, रंजले आणि गांजले कोणीही असोत, त्यांच्या जगण्याची न्याय मांडणी आंबेडकर कविता करते''१

आंबेडकरवादी कविता वरील संदर्भानुसार माणूस हा गुलामगिरी पासून मुक्त झाला पाहिजे. या कवितेतील नायक व नायिका ह्या नियतीला शरण जात नाहीत. व निराश होऊन हार मानत नाही. तर क्रांती व परिवर्तनासाठी संघर्ष करताना आढळून येतात व अन्याय अत्याचाराचा जाहीर निषेध करतात. बहुजनवादी दृष्टिकोन समोर ठेवून न्यायाची मागणी आंबेडकरवादी कविता सदोदित करतात. म्हणून आंबेडकरवादी कविता ही माणसाकडे एक मूल्य म्हणून पाहते. माणसाच्या स्वातंत्र्याच्या आड येणारी परंपरा ,धर्म, रूढी आणि व्यवस्था ती जाहीरपणे नाकरते. व त्या विरोधात बंड करून उठते, हे ध्येय आंबेडकरवादी स्त्रीवादी कवितेत प्रामुख्याने व प्रखरपणे दिसून येते. हे मान्य करताना' प्रज्ञा पवार 'असे म्हणतात की. ....''

''माझ्या कवितेला स्त्रीवादी, दलित स्त्रीवादी, दलित, बहुजनवादी स्त्रीवादी ,अशी अनेक बिरुदे लावलेली आहेत. आणि ती मला यामुळेच अजिबात त्रासदायक वाटत नाहीत ''२ यावरून असे सिद्ध होते की, आम्हाला कोणत्याच बिरुदावली ची गरज नाही. कारण आम्ही आंबेडकरवादी विचार घेऊन आंबेडकरवादी कविता लिहून समाजात सामाजिक बांधिलकी संविधानिक लोकशाहीच्या विधायक मार्गाने समाज जागृत करत आहोत. त्यामुळे आम्हाला कोणाच्याही पदवीची किंवा बिरुदे लावून घेण्याची गरज नाही. हाच आंबेडकरवादी कवितेचा मुख्य प्रांजळ हेतू व उद्देश आहे.

**आंबेडकरवादी स्त्री कवितेतील जाणिवांचा आशय :–**

आंबेडकरवादी कवितेतील जाणीव ही लोकशाही मूल्यांची जाणीव आहे. ते नकार आणि विद्रोह या आंबेडकरवादी मूल्याची कास धरून आंबेडकरवादाची पेरणी करतात. आपल्या कवितेतून मानवी जीवन मुल्याची पेरणी करताना आंबेडकरवादी कविता सतत जाणवत राहते. आंबेडकरवादी कविता जात, धर्म ,वर्ण, अंधश्रद्धा, विषमता, निरक्षरता, दारिद्र्यात, लाचारी, उपासमार आणि शोषण यांचा जाहीर निषेध करते. मानवी मूल्यांचा स्वीकार करते. हे सिद्ध करताना आंबेडकरवादी कवयित्री' मनीषा कांबळे' म्हणतात की,.....

''हजारो वर्षाची माणसं
गुलामांच्या पिंजरा सोडत होती.
अन्याय–अत्याचार आत भाजून
रात्रंदिवस रडत होती.
त्यांच्या जीवनात आंबेडकर
नावाचा प्रज्ञावंत महासूर्याने
उजेडाची दालने उघडली
आणि ती पिंजऱ्यातील माणसं
आत्ता त्या प्रज्ञा सूर्याच्या प्रेरणेने
'फिनिक्स' पक्ष्याप्रमाणे राखेतून
उड्डाण घेत... आकाशाला
गवसणी घालत आहेत...३.        (उड्डान) मनीषा कांबळे.

अशाप्रकारे हजारो वर्षांची गुलामगिरी नष्ट करण्याचे सामर्थ्य प्रज्ञा सूर्याच्या प्रेरणेने आम्ही स्वीकारले आहे. तद्ववतच 'फिनिक्स' पक्षाप्रमाणे आम्ही आता प्रगती करीत आहोत. यापुढेही जाऊन आंबेडकरवादी कवयत्री प्रमाणे आंबेडकरवादी कवितेनेही हा आंबेडकरवाद स्पष्टपणे स्वीकारून व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे ते व्यक्त करताना कवी 'अशोक इंगळे '(विद्रोह) या कवितेत आंबेडकर वादी विचार व्यक्त करताना म्हणतात की.......

'' मित्रा तुझ्या डोळ्यांना सहन
होत नाही तर तू
झोपडपट्टीतील आणि फुटपाथवरचे
जिवंत दृश्य का पाहतो रे?
ते ही मोठ्य हट्टाने
बर पाहतो तर पाहतो
मग असा अश्रू का ढाळतो
अरे मी सध्या त्यांच्याच
विद्रोहाची गाणी लिहितोय'' ४ (युद्ध पक्षी) अशोक इंगळे.

वरील प्रमाणे नागरी भागातील झोपडपट्टीतील आणि फुटपाथवरील जीवनाचे चित्रण अतिशय वास्तव रुपाने कवीने कवितेतून मांडले आहे. कवींनी वास्तव चित्रण काव्यात वर्णन केल्यामुळे आंबेडकरवादी कविता ही परिवर्तनाचे वलय घेऊन समाजात संचार करते. त्यामुळे आंबेडकरवादी कविता ही सामाजिक ,आर्थिक तसेच राष्ट्रवादी तत्त्वज्ञान घेऊन मानवतावादाचे आणि विज्ञानवादाचे मूल्य स्वीकारते. यावरून आंबेडकरवादी कवितेची काही तत्त्वे व मूल्य आढळून येतात ती खालील प्रमाणे...

**' आंबेडकरवादी कवितेची मूल्य व तत्व :=**

| | | | |
|---|---|---|---|
| १) '' समता | २) स्वातंत्र्य | ३) बंधुभाव | ४) न्याय |
| ५) धम्म | ६) लोकशाही | ७) महिला अधिकार | ८) अहिंसा |
| ९) सत्य | १०) मानवता | ११) विज्ञानवाद | १२) सविधान'' ५. |

अशाप्रकारे आंबेडकरवादी कवितेची तत्व आणि मूल्य एक मानवतावादी क्रांतिकारी प्रेरणा आहे. त्याचे स्वरूप वैशिष्ट्ये हेच आंबेडकरवादी विचाराचे तत्त्व मूल्य आहे.

**समारोप :—**

उपरोक्त संशोधन शोध निबंधातून निष्कर्ष अंती असे निष्कर्ष हाती येतात की, परंपरेने चालत आलेल्या व्यवस्था, धर्म, रूढी आणि परंपरेने नाकारलेली' स्त्री' ही आंबेडकर वादाने पूर्णपणे स्वीकारलेली आहे. ती ही खंबीरपणे नेतृत्व करू शकते. हे आंबेडकरवादी कवितेने सिद्ध केले आहे. आंबेडकरवादी कवितेतील स्त्री जाणिवांची स्वरूप व वैशिष्ट्ये या शोधनिबंधामध्ये याच सत्य व सात्विक मूल्याचे संशोधन करण्याचा प्रयत्न सदरील शोधनिबंधामध्ये केला आहे. वर्णन केलेल्या आंबेडकरवादी कवितेतील स्त्री जाणीव यांच्या स्वरूप वैशिष्ट्ये यातुन असे निदर्शनास येते की, आंबेडकरवादी कविता ही माणसाच्या जीवनाविषयी एक दृष्टिकोन माणसामाणसात समता मानते. जन्म, अंश इत्यादीमुळे निर्माण होणाऱ्या भेद भावांना आंबेडकरवादी कविता स्पष्टपणे नकार देते. माणसाला माणूसपणाच्या न्यायाची जाणीव व कदर व करुणामय असावी अशी निष्ठावान अपेक्षा आंबेडकरवादी कविता स्त्री लेखनातून व्यक्त करते. धर्म, वंश

ISSN 2455-4375

आणि जात इत्यादीमुळे कोणीही कोणाचाही बंधनात ठेवता कामा नये. असे तिचे स्वरूप वैशिष्ट्ये व्यक्त करते. वरील संशोधनातूनआंबेडकरवादी कविताही गुलामगिरीला स्पष्टपणे नकार नकार देत आहेत हे सिद्ध होते. तद्वतच समता, स्वातंत्र्य, आणि लोकशाहीचा स्वीकार करते. हेच या शोधनिबंधातून स्पष्टपणे व्यक्त केले आहे.

**संदर्भ सूची :–**

१. डॉ. 'पद्माकर तामगाडगे' (संपादक) 'आंबेडकरवादी कविता निर्मिती' संवाद, प्रकाशन कोल्हापूर. २०१४ पृ. क्र. २९.
२. प्रज्ञा दया पवार, 'स्त्रीलिखित मराठी कविता'(संपादन)' अरुणा ढेरे' पद्मगंधा, प्रकाशन २०१६ पृ.क्र. २६.
३. मनीषा कांबळे, 'सूर्यांचा सूर्य' प्रज्ञा, प्रकाशन, २००३ पृ. क्र. ०२.
४. प्रा. 'अशोक इंगळे', प्रज्ञा, प्रकाशन यवतमाळ. २००४ पृ. क्र.०२
५. mr.wikipedia.org (आंबेडकरवादी विकिपीडिया)